जागतिक बँक सहाय्यित मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्पातील शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रकल्प भत्ता मंजूर करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक :- कृवपदुम १९०५४/१३/२०२४/MAG-८A (E-७३२४१४)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ३ जुलै, २०२६.

**वाचा:**

१. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय,क्रमांक:- कृव्यप्र - ४६१८/प्र.क्र.१०२/८-अे, दि. २४.०७.२०१८

२. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय,क्रमांक:- कृव्यप्र - ४६१८/प्र.क्र.१०२/८-अे, दि. १९.०१.२०१९

३. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय,क्रमांक:- कृव्यप्र - ४६१८/प्र.क्र.१०२/८-अे, दि. २७.०५.२०१९

४. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय,क्रमांक:- कृव्यप्र - ४६१८/प्र.क्र.१२९/८-अे, दि. २७.०५.२०१९

५. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय,क्रमांक:- कृव्यप्र - ४६१९/प्र.क्र. ७०/८-अे, दि. ११.०९.२०१९

६. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय,क्रमांक:- कृव्यप्र - ४६१९/प्र.क्र. ५७/८-अे, दि. ११.०९.२०१९

७. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्रमांक:- कृव्यप्र - ४६१८/प्र.क्र.१२९/८-अे, दि.११.११.२०२१

८. प्रकल्प संचालक, मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प यांचे पत्र क्र.स्मार्ट/पीसीएमयु/प्रकल्प भत्ता/८४/२०२२, दि.२४.१.२०२२ व स्मार्ट/पीसीएमयु/ लेखा/ प्रकल्प भत्ता/ १११९/२०२३, दि.२२.६.२०२३

**प्रस्तावना:**

जागतिक बँक (IBRD) अर्थसहाय्यित "महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प" हा सुमारे रु. २२२० कोटी (३०० दशलक्ष डॉलर) गुंतवणूकीचा प्रकल्प राबविण्यास संदर्भ क्र.२ येथील दिनांक १९.०१.२०१९ च्या शासन निर्णयान्वये तत्वत: मान्यता देण्यात आली असून प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळासह प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्थापण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या प्रकल्पाचा आराखडा तयार करण्याकरिता उच्चस्तर सचिव समितीच्या मान्यतेने प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकरिता प्रथम टप्प्यात पूर्णवेळ ३७ पदे (१४ शासकीय व २३ बाह्यस्त्रोताद्वारे) कृषि आयुक्तालयाच्या आस्थापनेवर अस्थायी स्वरुपात निर्माण करण्यास संदर्भ क्र. ४ येथील दिनांक २७.०५.२०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्प राबविण्यास व जागतिक बँकेसोबत करार करण्यास संदर्भ क्र. ५ येथील दिनांक ११.०९.२०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली असून संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये संस्था स्थापन करून सदर संस्थेमार्फत प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास संदर्भ क्र. ६ येथील दिनांक ११.०९.२०१९ शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

दिनांक २७.०५.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रकल्पाकरिता मंजूर केलेली ३७ पदे आणि नव्याने निर्माण केलेली ४६७ पदे मिळून प्रकल्पाकरिता उच्च स्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने एकूण ५०४ पदांच्या आकृतीबंधास संदर्भ क्र.७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

प्रकल्प संचालक, मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प, पुणे यांनी संदर्भ क्र. ८ येथील पत्रान्वये प्रकल्पातील शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रकल्प भत्ता मंजूर करण्याबाबतची विनंती केली आहे. जागतिक बँक अर्थसहाय्यित मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प हा राज्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प असल्याने सदर प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य व कार्यक्षमता वाढविण्याच्या अनुषंगाने सदर प्रकल्पांतर्गत नियुक्ती वा प्रतिनियुक्तीने पूर्ण वेळ काम करणाऱ्या शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रकल्प भत्ता मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**<u>शासन निर्णय</u>:-**

१. मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्पांतर्गत नियुक्ती वा प्रतिनियुक्तीने पूर्ण वेळ कार्यरत असणाऱ्या शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना सन २०२४-२५ या आर्थिक वर्षापासून सदर प्रकल्पाच्या अंतिम तारखेपर्यंत म्हणजेच दि.३१/०३/२०२७ या कालावधीसाठी ७ व्या वेतन आयोगानुसार निश्चित होणाऱ्या मूळ वेतनाच्या १२.५० टक्के प्रकल्प भत्ता म्हणुन अदा करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. प्रकल्पांतर्गत शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना अदा करावयाच्या प्रकल्प भत्त्याची रक्कम प्रकल्प किंमतीतून भागविण्यात यावी. सदर रक्कम जागतिक बँकेकडून प्रतिपूर्तीसाठी अनुज्ञेय असेल.

३. प्रकल्पातंर्गत मंजूर केलेल्या ५०४ पदांपैकी नियुक्ती वा प्रतिनियुक्तीने पूर्ण वेळ काम करणाऱ्या २१४ शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या पदांना प्रकल्प भत्ता मंजूर केलेला असून सदर पदांची यादी या शासन निर्णयासोबत परिशिष्ट - अ येथे जोडली आहे.

४. सदर प्रकल्प भत्ता पूर्णतः स्वतंत्र असून तो इतर कोणत्याही बाबींच्या परिगणनेसाठी अथवा प्रयोजनासाठी विचारात घेता येणार नाही (महागाई भत्ता, दैनिक भत्ता, प्रवास भत्ता, वेतनवाढ, वेतन निश्चिती, सेवानिवृत्ती वेतन इ.)

५. संदर्भाधिन शासन निर्णय दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ मधील तरतूदी नुसार, प्रकल्पांतर्गत शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांचे मंजूर पद श्रेणी अवनत करून ते कनिष्ठ अधिकारी / कर्मचाऱ्यांमधून भरण्यात आले असल्यास सदर कनिष्ठ अधिकारी / कर्मचाऱ्यांना देखील प्रकल्प भत्ता अनुज्ञेय राहील.

६. प्रकल्पांतर्गत कंत्राटी पद्धतीने भरावयाच्या पदांवर जर शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांची अपवादात्मक परिस्थितीत नियुक्ती करावी लागल्यास सदर अधिकारी / कर्मचाऱ्यांना देखील प्रकल्प भत्ता अनुज्ञेय राहील.

७. मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्पांतर्गत कंत्राटी पद्धतीवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना प्रकल्प भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

८. महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ नुसार अनुज्ञेय असणाऱ्या रजेचा कालावधी १५ दिवसांपेक्षा जास्त होत असल्यास संबधित महिन्यात प्रकल्प भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

९. प्रतिनियुक्तीवरील अधिकारी / कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेला प्रतिनियुक्ती भत्ता वजा करुन प्रकल्प भत्ता अदा करण्यात यावा.

१०. प्रकल्प भत्त्याबाबत यानंतर काही सुधारित आदेश निर्गमित करण्यात आल्यास किंवा अन्य काही कारणास्तव अधिकारी / कर्मचाऱ्यांकडे थकबाकी निघाल्यास ती संबंधितांकडून वसूल करण्यात येईल.

११. संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कामाची प्रत पाहून प्रकल्प भत्ता पूर्णतः अथवा अंशतः कमी करण्याचा अधिकार प्रकल्प संचालकांना राहील.

१२. प्रकल्प भत्त्याकरिता येणारा खर्च प्रकल्पाच्या पुढील लेखाशिर्षाखाली प्रती वर्ष मंजूर करण्यात येणाऱ्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागविण्यात यावा.

| | |
|---|---|
| मागणी क्र. डी-३<br>२४०१-पीक संवर्धन<br>(११५) लहान/सीमांत शेतकरी व कृषि मजूरांसाठी योजना<br>(००) (०५) मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परीवर्तन प्रकल्प (बाह्य हिस्सा ७२.४१%)<br>(२४०१A९६९) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) | मागणी क्र. डी-३<br>२४०१-पीक संवर्धन<br>(११५) लहान/सीमांत शेतकरी व कृषि मजूरांसाठी योजना<br>(००) (०४) मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परीवर्तन प्रकल्प (राज्य हिस्सा २७.५९%)<br>(२४०१A९५१) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) |

१३.सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४२/२०२६/व्यय-१, दि.०४.०६.२०२६ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१४.सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७०३१४४७२०३३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GANPAT SANDIPAN KACHARE

Digitally signed by GANPAT SANDIPAN KACHARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and Adf dept, 2.5.4.20=3021BF955FEFD71FFAD5DD7C97769147F19ACA6383A12FED6CFF4849D78E224A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B5B30AEBA818C77E43E7B8BA4BCA0E9F0D137FEAB0BBCB16CACF2D44087E8A76, cn=GANPAT SANDIPAN KACHARE
Date: 2026.07.03 14:48:29 +05'30'

**(ग. सं. कचरे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१. मा. मंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव (मुख्यमंत्री सचिवालय), मंत्रालय,मुंबई
५. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव (ग्राम विकास), ग्रामविकास विभाग, मंत्रालय,मुंबई
९. प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव (सहकार व पणन), सहकार, वस्त्रोद्योग व पणन विभाग , मंत्रालय, मुंबई

११. प्रधान सचिव (महिला व बाल विकास), महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. आयुक्त (कृषि), आयुक्त कार्यालय, पुणे
१६. प्रकल्प संचालक, मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७. आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. आयुक्त, सहकार, महाराष्ट्र राज्य, पुणे
१९. आयुक्त, पुणे महानगर पालिका, पुणे
२०. व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई
२१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ, नागपूर
२२. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, मुंबई
२३. संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, पुणे
२४. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
२५. व्यवस्थापकीय संचालक, ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशन, मुंबई
२६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकार विकास महामंडळ, मुंबई
२७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे
२८. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, मुंबई
२९. मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशन, पुणे
३०. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
३१. महालेखापाल १/२ (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/ नागपूर
३२. सह संचालक लेखा व कोषागारे संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई ३२
३३. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई/ निवासी लेखा अधिकारी, मुंबई
३४. वरिष्ठ कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, पुणे
३५. कक्ष अधिकारी, (का. व्यय-१/अर्थसंकल्प-१३), वित्त विभाग मंत्रालय,मुंबई
३६. कक्ष अधिकारी, (का. १४३१), नियोजन विभाग मंत्रालय,मुंबई
३७. निवडनस्ती(८-अे).

शासन निर्णय क्रमांक :- कृवपदुम १९०५४/१३/२०२४/MAG-८A (E-७३२४१४)
दिनांक ३ जुलै, २०२६ सोबतचे परिशिष्ट - अ

## जागतिक बँक सहाय्यीत मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्पांतर्गत शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांची मंजूर २१४ पदे

| अ. क्र. | पदनाम व संवर्ग | वेतनश्रेणी | मंजुर पदांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | प्रकल्प संचालक/ आयुक्त (कृषि) भा.प्र.से. (स्थापित) | अनुज्ञेयते प्रमाणे | १ |
| २ | अतिरिक्त प्रकल्प संचालक संवर्ग पद (महाराष्ट्र कृषि सेवा गट अ) | एस-२५ रु.७८८००-२०९२०० | १ |
| ३ | वित्त विशेषज्ञ संवर्ग पद (उप संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा) | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | १ |
| ४ | धोरण विश्लेषक संवर्ग पद (महाराष्ट्र कृषि सेवा गट अ) | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | १ |
| ५ | संनियंत्रण व मुल्यमापन तज्ज्ञ संवर्ग पद महाराष्ट्र कृषि सेवा गट अ) | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | १ |
| ६ | उप अभियंता (स्थापत्य) (संवर्ग पद, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग) | एस-२० रु.५६१००-१७७५०० | १ |
| ७ | कृषि तंत्रज्ञान क्षमताबांधणी तज्ज्ञ (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट अ) | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | १ |
| ८ | वरिष्ठ कृषि मुल्य साखळी तज्ज्ञ (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट अ) | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | २ |
| ९ | प्रशासकीय अधिकारी मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गातून प्रतिनियुक्तीने | एस-२० रु.५६१००-१७७५०० | १ |
| १० | तंत्र अधिकारी संवर्ग पद (महाराष्ट्र कृषि सेवा गट ब) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| ११ | तंत्र अधिकारी संवर्ग पद (महाराष्ट्र कृषि सेवा गट ब) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| १२ | तंत्र अधिकारी संवर्ग पद (महाराष्ट्र कृषि सेवा गट ब) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| १३ | तंत्र अधिकारी संवर्ग पद (महाराष्ट्र कृषि सेवा गट ब) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| १४ | कृषि अभियंता (काढणी पश्चात तंत्रज्ञान) (प्रतिनियुक्ती) महाराष्ट्र कृषि सेवा गट ब) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| १५ | लेखाधिकारी संवर्ग पद (महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट ब) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| १६ | लेखाधिकारी संवर्ग पद (महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट ब) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| १७ | सहाय्यक लेखाधिकारी संवर्ग पद (महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट क) | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | २ |
| १८ | सहाय्यक अधिक्षक (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि प्रशासकीय सेवा गट-क) | एस-१३ रु.३५४००-११२४०० | २ |
| १९ | नोडल अधिकारी (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट - अ) | एस-२० रु.५६१००-१७७५०० | १ |
| २० | कृषि विद्यावेत्ता (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट - ब) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| २१ | फलोत्पादन विद्यावेत्ता (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट ब) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| २२ | क्षमताबांधणी तज्ज्ञ (संवर्ग पद महाराष्ट्र कृषि सेवा गट - ब) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| २३ | लेखाधिकारी (संवर्ग पद, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| २४ | सहायक लेखाधिकारी (संवर्ग पद, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट - ब) | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | १ |
| २५ | कृषि व्यवसाय मूल्य साखळी तज्ज्ञ (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट ब) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| २६ | संनियंत्रण व मूल्यमापन तज्ज्ञ (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट ब) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| २७ | निविष्ठा व गुणनियंत्रण तंत्रज्ञान तज्ञ (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट - अ) | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | १ |
| २८ | नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन तज्ञ (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट - अ) | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | १ |
| २९ | अन्न प्रक्रिया व्यवस्थापन तज्ञ (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट - अ) | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | १ |
| ३० | मनुष्यबळ विकास व क्षमता बांधणी तज्ञ (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट -अ) | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | १ |
| ३१ | कृषि निर्यात व काढणीपश्चात तंत्रज्ञान व्यवस्थापन तज्ज्ञ (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट - अ) | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | १ |
| ३२ | कृषि व्यवसाय व्यवस्था तज्ज्ञ (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट - अ) | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | १ |
| ३३ | नोडल अधिकारी, विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ) | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | ८ |
| ३४ | सहाय्यक अभियंता प्रतिनियुक्ती, सहाय्यक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग) | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | ८ |
| ३५ | संनियंत्रण व मूल्यमापन व एम आय एस तज्ज्ञ (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट-क) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | ८ |
| ३६ | नोडल अधिकारी, उप संचालक (कृषि व्यवसाय) (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ | एस-२० रु.५६१००-१७७५०० | ३४ |

| अ. क्र. | पदनाम व संवर्ग | वेतनश्रेणी | मंजुर पदांची संख्या |
|---|---|---|---|
| ३७ | पुरवठा साखळी व मुल्य साखळी तज्ज्ञ तथा कृषि व्यवसाय सल्लागार (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट ब) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | ३४ |
| ३८ | मल्टीटास्किंग ग्रेडर (तालुका स्तर) (संवर्ग पद, कापूस पणन महासंघातील कर्मचारी प्रतिनियुक्तीने) | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | १९ |
| ३९ | मल्टीटास्किंग ग्रेडर (तालुका स्तर) (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट-क) | एस-१३ रु.३५४००-११२४०० | ४१ |
| ४० | नोडल अधिकारी, पशुसंवर्धन (संवर्ग पद, सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन/ वरिष्ठ पशुधन विकास अधिकारी) | एस-२० रु.५६१००-१७७५०० | १ |
| ४१ | तंत्र अधिकारी, विस्तार व क्षमता बांधणी (संवर्ग पद, सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन/ वरिष्ठ पशुधन विकास अधिकारी) | एस-२० रु.५६१००-१७७५०० | १ |
| ४२ | पशुधन मूल्य साखळी तज्ज्ञ (समन्वयक सल्लागार (संवर्ग पद, सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन / वरिष्ठ पशुधन विकास अधिकारी) | एस-२० रु.५६१००-१७७५०० | १ |
| ४३ | तंत्र अधिकारी (क्षमता बांधणी व बाजार समिती संनियंत्रण) (संवर्ग पद, उप निबंधक, सहकारी संस्था) | एस-२० रु.५६१००-१७७५०० | १ |
| ४४ | तंत्र अधिकारी (सुधारणा कामकाज सुसूत्रता व तक्रार निवारण) (संवर्ग पद, उप निबंधक, सहकारी संस्था) | एस-२० रु.५६१००-१७७५०० | १ |
| ४५ | व्यवस्थापक, शहरी अन्न साखळी पथदर्शक प्रकल्प (पणन मंडळा तील व्यवस्थापक संवर्गातील पद) | एस-१७ रु.४७६००-१५११०० | १ |
| ४६ | लेखापाल (संवर्ग पद, महाराष्ट्र लेखा व वित्त सेवा गट क) | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | १ |
| ४७ | सहाय्यक (संवर्ग पद, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ) | एस-८ रु.२५५००-८११०० | १ |
| ४८ | कृषि तंत्र अधिकारी (संवर्ग पद महाराष्ट्र कृषि सेवा गट ब संवर्ग) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| ४९ | नोडल अधिकारी, (संवर्ग पद सरव्यवस्थापक महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ) | एस-२७ रु.११८५००-२१४१०० | १ |
| ५० | लेखाधिकारी (संवर्ग पद महाराष्ट्र वित्त व लेखा गट-ब) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| ५१ | ग्रेडर (संवर्ग पद महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ) | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | २ |
| ५२ | स्मार्ट कापूस व्यवस्थापक(संवर्ग पद महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ) | एस-२३ रु.६७७००-२०८७०० | २ |
| ५३ | कृषि व्यवसाय अधिकारी (संवर्ग पद महाराष्ट्र कृषि सेवा गट ब) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| ५४ | नोडल अधिकारी (सहकार) (संवर्ग पद, उप निबंधक, सहकारी संस्था) | एस-२० रु.५६१००-१७७५०० | १ |
| ५५ | कृषि मूल्य साखळी तज्ज्ञ (संवर्ग पद महाराष्ट्र कृषि सेवा गट ब कनिष्ठ) | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | १ |
| ५६ | कृषि तंत्र अधिकारी (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट - ब) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| ५७ | कृषि तंत्र अधिकारी (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट - ब) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| ५८ | राज्य अभियान व्यवस्थापक, ब्रीज टेक्निकल सपोर्ट (संवर्ग पद महाराष्ट्र ग्रामीण विकास सेवा गट ब/ सहाय्यक गट विकास अधिकारी) | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | १ |
| ५९ | अभियान व्यवस्थापक (पीपी/ एमएपी/ कृषिमूल्य साखळी) (संवर्ग पद महाराष्ट्र ग्रामीण विकास सेवा गट ब/सहाय्यक गट विकास अधिकारी) | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | १ |
| ६० | राज्य अभियान व्यवस्थापक (बीडीएस व सीएमए) (संवर्ग पद महाराष्ट्र ग्रामीण विकास सेवा गट ब/सहाय्यक गट विकास अधिकारी) | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | १ |
| ६१ | कृषि व्यवसाय अधिकारी(संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| ६२ | लेखाधिकारी (संवर्ग पद महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| ६३ | कृषि तंत्र अधिकारी (संवर्ग पद, महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब ) | एस-१६ रु.४४९००-१४२४०० | १ |
| ६४ | अन्न सुरक्षा तज्ज्ञ (संवर्ग पद, अन्न सुरक्षा अधिकारी, गट-ब, अन्न व औषध प्रशासन विभाग) | एस-१५ रु.४१८००-१३२३०० | १ |
| | **एकुण** | | **२१४** |

***********************

GANPAT SANDIPAN KACHARE

Digitally signed by GANPAT SANDIPAN KACHARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and Adf dept,
2.5.4.20=3021BF955FEFD71FFADSDD7C97769147F19ACA6383A12FED6CFF4849D78E224A, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=B5B30AEBA818C77E43E7B8BA4BCA0E9F0D137FEAB0BBCB16CACF2D44087E8A76, cn=GANPAT SANDIPAN KACHARE
Date: 2026.07.03 14:49:06 +05'30'